**उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद परिसरातील उद्यानांच्या देखभालीचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधी व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एचसीटी-५२१७/७९२/प्र.क्र.९४/का.४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
तारीख: १६ नोव्हेंबर, २०१७

**वाचा -**

१) प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे पत्र क्र. N/Cash/१३२३३/२०१७, दि. १२/०९/२०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/वि.सु. १, दि.०२/०२/२०१३.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वि.सु. १, दि.०२/१२/२०१३.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वि. सु. -१, दि.०२/०८/२०१६.
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा विभाग, क्र. भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग ४, दि. १/१२/२०१६.
६) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र. कंत्राटी-२०१६/प्र.क्र.१९४/का.१२, दि. २३/०२/२०१७.

**प्रस्तावना -**

प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी शक्य असेल तेथे बाह्ययंत्रणेद्वारे कामे करण्याच्या मार्गदर्शक सूचना वित्त विभागाने संदर्भाधीन क्र. २, व ३ येथील शासन परिपत्रकान्वये प्रसारित केल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. ४ येथील वित्त विभागाच्या दि. ०२/०८/२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार साफसफाई स्वरूपाची अकुशल मनुष्यबळ आवश्यक असणारी कामे करण्यासाठी बाह्ययंत्रणेद्वारे करण्यासंबंधी विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने संबंधित कार्यालयाचे मोजमाप करुन व प्रचलित कार्यपध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदार/संस्था यांच्याशी करार करण्याच्या सूचना प्रसारित केल्या आहेत. त्यानुसार राज्यातील न्यायालयांमध्ये बाह्यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने वर्ग-३ व वर्ग-४ पदांच्या सेवा उपलब्ध करताना अनुसरावयाची कार्यपध्दती विधि व न्याय विभागाच्या संदर्भांधीन दि. २३/०२/२०१७ च्या आदेशान्वये विहीत करण्यात आली आहेउच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद प्रशासनाने उपरोक्त मार्गदर्शक तत्वांचे तसेच निविदा प्रक्रिया राबविण्यासंबंधी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या पद्धतीचे अनुपालन करून औरंगाबाद खंडपीठ परिसरातील उद्यानांच्या देखभालीचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करण्यासाठी नियुक्त केलेल्या आणि खंडपीठ प्रशासनाने प्रमाणित केलेल्या सेवापुरवठादाराची नियुक्ती करण्याचा आणि त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय-

उच्च न्यायालय, मुंबई च्या खंडपीठ औरंगाबाद येथील न्यायालयीन इमारतीच्या परिसरातील उद्यानांचे संगोपन, संरक्षण, विकास व देखभालीचे काम बाह्ययंत्रणेद्वारे मेसर्स शिवम नर्सरी, औरंगाबाद या सेवापुरवठादाराकडून त्यांच्याशी करार करण्यात आल्या दिनांकापासून पुढील दोन वर्षांच्या कालावधीत करून घेण्यास तसेच त्यानुषंगाने सर्व करांसहित येणाऱ्या प्रतिवर्ष रु.१२,३८,८८७/- याप्रमाणे उक्त दोन वर्षांसाठी एकूण रु. २४,७७,७७४/- (रुपये अक्षरी चोविस लक्ष सत्त्याहत्तर हजार सातशे चौऱ्याहत्तर फक्त) इतक्या खर्चास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सेवापुरवठादार संस्थेकडून कंत्राटी सेवेसाठी पुरविण्यात आलेले कर्मचारी हे पूर्णवेळ कर्मचारी असतील. सदर साफसफईचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करताना उपरोक्त सेवापुरवठादारास तसेच उच्च न्यायालय प्रशासनास संदर्भाधीन शासन निर्णयांमधील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक असेल.

३. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी यानुषंगाने १५ दिवसांच्या आत संबंधित सेवापुरवठादाराशी योग्य तो करार करुन त्याची प्रत शासनास सादर करावी. उपरोक्त सेवाकरार करारनाम्याच्या दिनांकापासून २ वर्ष कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल. या कराराची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रसारित करण्यास पूर्वपरवानगी मागण्यासाठी प्रस्ताव किमान दोन महिने आधी शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

४. याप्रित्यर्थचा होणारा खर्च हा "मागणी क्र. जे-१, २०१४ न्यायदान (अनिवार्य), १०२- उच्च न्यायालये (०३) (०१) प्रबंधक, अपील शाखा, (२०१४ ००९२) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वित्तिय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. प्रस्तुत आदेश हे सार्वजनिक बांधकाम विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ७११/इमा २, दि. १३/१०/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या सहमतीने तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग चार, अनुक्रमांक ११ अन्वये प्रशासनिक विभागास प्राप्त अधिकारांतर्गत तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१६०११४२३१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjeev Rajaram Keluskar

Digitally signed by Sanjeev Rajaram Keluskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Low And Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a521517a0d3fba83ff4473cb0d448a75f9b7f83cba41836833b60c93758c804, cn=Sanjeev Rajaram Keluskar
Date: 2017.11.16 16:03:41 +05'30'

**(संजीव केळूसकर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.

२. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

३. प्रबंधक ( वित्त व अर्थसंकल्प ) अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

४. प्रबंधक ( प्रशासन ), उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद.

५. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखाअनुज्ञेयता) महाराष्ट्र, दोन, नागपूर.

६. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.

७. वित्त विभाग, व्यय ५, वि. सु. १, मंत्रालय, मुंबई.

८. कक्ष अधिकारी, का. २३/२४ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. निवड नस्ती.